**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.३५६/एसएम-२ दिनांक:- १६ जुलै, २०२४

## मान्यता पत्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

सरस्वती दर्शन फाऊंडेशन,

वानवडी, पुणे.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे संचलित सिटी वर्ल्ड स्कूल, सर्व्हे क्र. ८६/२अे/१, ८६/२अे, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे.

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.३५६/एसएम-२, दि. १४.०६.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **सिटी वर्ल्ड स्कूल, सर्व्हे क्र. ८६/२अे/१, ८६/२अे, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे संचलित सिटी वर्ल्ड स्कूल, सर्व्हे क्र. ८६/२अे/१, ८६/२अे, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी,(प्राथमिक/माध्यमिक), जि.प., पुणे.
७. निवड नस्ती एसएम-२ (३५६/२३).

**महाराष्ट्र शासन**


शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय (विस्तार), दालन क्र.432,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-32.

Email ID:- sm2.sesd-mh@gov.in


क्रमांक:- **एसएफएस - 1023/प्र.क्र.356/एसएम-2** दिनांक:- **14 Jun 2023** No.:- **1904231186**

**इरादा पत्र**

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

**SARASWATI DARSHAN FOUNDATION, FLAT NO 802 BUILDING A5 GANGA SATELITE, WANOWARI, PUNE, 411040**

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी इरादापत्र. CITY WORLD SCHOOL/SURVEY NO 86/2A/1 , 86/2A MANJARI BUDRUK, TALUKA, MANJARI BK, HAVELI, Pune, 412307

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत SARASWATI DARSHAN FOUNDATION या संस्थेने शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून CITY WORLD SCHOOL PRIMARY TO HIGHER SECONDARY 1 TO 12 STATE BOARD English ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी अर्ज सादर केला होता.

२. वर नमुद केलेल्या विषयावरील आपल्या अर्जाच्या संदर्भात, आपणांस असे कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०20 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2022-23 पासून SARASWATI DARSHAN FOUNDATION संचलित CITY WORLD SCHOOL/SURVEY NO 86/2A/1 , 86/2A MANJARI BUDRUK, TALUKA, MANJARI BK, HAVELI, Pune, 412307/PRIMARY TO HIGHER SECONDARY 1 TO 12/STATE BOARD/English ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळा सुरु करण्यासाठी सदर शाळेचे काम सुरु करण्यास पुढील अटीं व शर्तीसह इरादा पत्र देण्यात येत आहे.

**३. अटी व शर्ती :-**

(एक) सदर इरादा पत्र, अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन केल्याशिवाय, मान्यता पत्राची हमी देत नाही.

(दोन) सदर इरादा पत्राच्या आधारे, नोंदणीकृत संस्था किंवा न्यास किंवा कंपनीला शाळा / दर्जावाढीचे वर्ग सुरू करता येणार नाही.

(तीन) सदर इरादा पत्राचा, सी.बी.एस.ई. / सी.आय.एस.सी.ई. / आय.जी.सी.एस.ई. / आय.बी., इत्यादी मंडळांच्या संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र म्हणून वापर करता येणार नाही.

(चार) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ आणि अधिनियमान्वये व नियमांन्वये शासनाने वेळोवेळी दिलेले निदेश, यांमध्ये विहीत केल्याप्रमाणे, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, पायाभूत व भौतिक सुविधा (वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल सुविधा, प्राचार्य व कर्मचारी वर्ग कक्ष, ग्रंथालय, प्रयोगशाळा, इत्यादींसारख्या) याबाबतची मानके, अटी व शर्ती यांचे अनुपालन करणे अनिवार्य असेल.

(पाच) वर नमूद केलेल्या सुविधांचे अनुपालन केल्यानंतर, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, संबंधित जिल्ह्याच्या क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाकडे मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करणे, ही संस्थेची किंवा न्यासाची किंवा कंपनीची जबाबदारी असेल.

(सहा) जर १८ महिन्यांच्या आत, मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करण्यात शाळा व्यवस्थापन अपयशी ठरत असेल तर, इरादा पत्र रद्द होईल. इरादा पत्राचा कालावधी, कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाऊ शकणार नाही.

(सात) इरादा पत्र दिल्यानंतर, प्रस्तावित शाळेचे ठिकाण बदलता येणार नाही. जर व्यवस्थापनाने, शासनाने मंजूर केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणच्या मान्यता पत्रासाठी अर्ज केला असेल तर, इरादा पत्र रद्द होईल.

(आठ) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरून, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले इरादा पत्र रद्द करू शकेल.

(नऊ) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने अधिनियमाच्या "अनुसूची ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवणे आवश्यक राहील.

**कक्ष अधिकारी/अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

Signature valid

Signed by:PRADIP SURESH PADOLE
Date: 2023.06.14 11:49:04 +05:30

**प्रत माहितीसाठी -**

1. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
2. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
3. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
4. विभागीय शिक्षण उप संचालक, Pune

5. शिक्षणाधिकारी,(प्राथमिक/माध्यमिक), जि.प Pune

6. निवड नस्ती एस एम २. एसएफएस - 1023/प्र.क्र.356/एसएम-2

Signature valid
Signed by:PRADIP SURESH PADOLE
Date: 2023.06.14 11:49:04 +05:30

# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०३ /ज रा कु/मान्यता/पुवि/२०२४/ 7662
दिनांक : 2 6 JUL 2024

प्रति,
अध्यक्ष/ सचिव, सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून इ.१ ली ते इ. १२ वी, सर्व शाखा, राज्यमंडळ संलग्नित इंग्रजी माध्यमाची नविन/दर्जावाढ शाळा सुरु करणेसाठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर निर्गमित शासन भान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.

सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे संचलित सिटी वर्ल्ड स्कूल, सर्व्हे क्र.८६/२अे/१,८६/२अे,मांजरी बुद्रुक, ता.हवेली जि पुणे

संदर्भ : १.विवेक सपकाळ, कार्यासन अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश जा.क्र. एसएएफएस- १०२३/प्र.क्र ३५६/एसएम-२ दिनांक १६.७.२०२४

२. सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे यांचे पत्र जा क्र १४० दिनांक १८.७.२०२४

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे संचलित सिटी वर्ल्ड स्कूल, सर्व्हे क्र.८६/२अे/१,८६/२अे,मांजरी बुद्रुक, ता.हवेली जि पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते इ. १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शाळैचे बांधकाम करण्याकरिता संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशात अ.क्र. १ ते १२अटी व शर्तीस अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती आपल्या संस्थेस/ शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव रवाना
श्री विवेक सपकाळ, कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव रवाना
शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे

## शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com

वेब साईट- WWW.dydepune .com

०३४४४

कार्यालय, राज्य,पुणे-

14 MAR 2024

आवक क्रमांक ०४३८

शाखा

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/ज.रा.कृ./शाळा मा.प्र./२०२३-२०२४/ /दिनांक : 13 MAR 2024

प्रति,

मा. अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण, तथा मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे -१.

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन/ दर्जावाढ शाळा मान्यता पत्र मिळणेस्तव प्रस्ताव सादर करणेबाबत

**नमूना एक क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाचा अहवाल** सरस्वती दर्शन फाऊंडेशन, पलॅट क्र.८०२, बिल्डींग अे-५, गंगा सॅटेलाईट, वानवडी, पुणे-४११०४० संचलित सिटी वर्ल्ड स्कूल सर्व्हे क्र ८६/२ओ/१,८६/२अे,मांजरी बुद्रुक, ता हवेली पुणे-४१२३०७

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२ कडील अधिसूचना दिनांक ५.१०.२०२०

२.मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील आदेश जा.क्र. आस्था/प्राथ- १०६/स्वयंअर्थ/२०२२/२६९७,दि.९.५.२०२२

३.मा. अध्यक्ष,राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील सभा दिनांक १४.५.२०२२

४.मा. अध्यक्ष,राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे तथा यांचेकडील आदेश जा.क्र. शि.सं.माध्य/स्वयंअर्थ/परिपत्रक/२०२२-२३/एस-४/४९७८, दि.२०.७.२०२२

५.श्री.प्रदिप पडोळे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांचेकडील आदेश जा क्र एसएफएस-१०२३/प्र क्र ३५६/एसएम-२, दिनांक १४.६.२०२३

६श्री.एन डी.धानापुने, विस्तार अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचेकडील तपासणी अहवाल दि.२६.९.२०२३

७.क्षेत्र प्राधिकरण समिती सभा दिनांक २१.२.२०२४ नुसार अ.क्र. १५ व्दारे मान्य प्रस्ताव

८.या कार्यालयाचे जा क्र शिउसं/प्राथ-२०४/ज रा कृ/मा प्र/२६३८/२०२३-२०२४, दिनांक २७.२.२०२४

९.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. माध्य/शिक्षण/स्वं अ शा./२२१८/२०२४, दि.५.३.२०२४

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत सादर करणेत येते की, सुधारित तपासणी सूचीनुसार प्रस्ताव सादर करावा यानुसार निर्देश मा. राज्यस्तरीय प्राधिकरणाकडून या कार्यालयास संदर्भीय क्र. २ नुसार प्राप्त झालेले होते. तदनंतर राज्यस्तरीय प्राधिकरणाकडील आढावा बैठकीत याबाबत निर्देश संदर्भीय क्र.३ दारे प्राप्त झाले होते. तदनंतर अ.क्र. १ ते १२ मुददयाव्दारे मा. राज्यस्तरीय प्राधिकरणामार्फत संदर्भीय क्र. ४ व्दारे सूचना प्राप्त झालेल्या होत्या.

तदनंतर सरस्वती दर्शन फाऊंडेशन, पलॅट क्र.८०२, बिल्डींग अे-५, गंगा सॅटेलाईट, वानवडी, पुणे-४११०४० संचलित सिटी वर्ल्ड स्कूल सर्व्हे क्र ८६/२ओ/१,८६/२ओ,मांजरी बुद्रुक, ता हवेली पुणे-४१२३०७ इंग्रजी माध्यम राज्यमंडळ संलग्नित इ.१ ली ते इ. १२ वी सर्व शाखा नविन शाळेस शासनाकडून संदर्भीय क्र ५व्दारे इरादापत्र निर्गमित झालेले आहे.

तदनंतर संदर्भीय क्र ६ व्दारे श्री.एन डी.धानापुने, विस्तार अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचेकडील तपासणी अहवाल दि.२६.९.२०२३ रोजीचा प्रस्तावासोबत प्राप्त झालेला आहे. तदनंतर संदर्भीय क्रमांक ७ व्दारे सदर शाळेचा प्रस्ताव दिनांक २१.२.२०२४ चे क्षेत्र प्राधिकरण पुणे यांचेकडील सभेत मान्य झालेला आहे. तदनंतर क्षेत्र प्राधिकरणाचे दि २१.२.२०२४ रोजीचे सभेतील मान्य प्रस्ताव सदस्य सचिवांचे नस्तीतील प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन या कार्यालयास सादर करणेबाबत या कार्यालयाने संदर्भ क्र. ८ व्दारे शि.अ. (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांना कळविले होते.

तदनंतर संदर्भीय क्र. ९ व्दारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून या कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. तरी शासनाने निर्गमित केलेल्या इरादापत्रात नमूद असलेनुसार सन २०२२-२०२३ पासून खालील तपशीलानुसार या पत्रासोबत २ प्रतीत ऑफलाईन प्रस्ताव उक्त नविन शाळेस मान्यता मिळणेस्तव सादर करीत आहोत स्विकार व्हावा ही विनंती.

| अ क्र | संस्थेचे नांव | नविन/दर्जावाढ शाळेचे नाव व ठिकाण | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | माध्यम | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सरस्वती दर्शन फाऊंडेशन, पलॅट क्र.८०२, बिल्डींग अे-५, गंगा सॅटेलाईट, वानवडी, पुणे-४११०४० | सिटी वर्ल्ड स्कूल सर्व्हे क्र ८६/२ओ/१,८६/२ओ,मांजरी बुद्रुक, ता हवेली पुणे-४१२३०७ संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२ कडील अधिसूचना दिनांक ५.१०.२०२० | राज्यमंडळ | नविन इ १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | नविन इ १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शिफारशीसह मान्यतेस्तव सादर |

आपला विश्वासू

(सत्येंद्र अहिरे)

अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग, पुणे-१

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**

मा. शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे तथा सदस्य सचिव,राज्यस्तरीय प्राधिकरण

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/1056/333/2024 पुणे 1 दिनांक: 14/01/2025

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे संचालित
सिटी वर्ल्ड स्कूल, ( 27254100233 ) सर्व्हे क्र.86/2अे/1,86/2अे, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे

विषय - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन मान्यता पत्र क्रमांक एसएफएस-1023/प्र.क्र.356/ एसएम-2, दिनांक 16/07/2024 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-203/ज.रा.कु./मान्यता/पुवि/2024/7662,दिनांक 26/07/2024
3.मुख्याध्यापक यांचेकडील प्रस्ताव दिनांक 19/07/2024
4.श्री. ज्ञानदेव खोसे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती हवेली, जि.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल13/12/2024

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 1 ली ते इयत्ता 4 थी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे | सिटी वर्ल्ड स्कूल, ( 27254100233 ) सर्व्हे क्र.86/2अे/1,86/2अे, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 1 ली ते इयत्ता 4 थी | 2024-25 |

## अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1023/प्र.क्र.356/ एसएम-2, दिनांक 16/07/2024 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. **भविष्यात या शाळेच्या प्रथम मान्यते बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.**

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

# पुणे जिल्हा परिषद, पुणे.
## यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

## प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/466/3578/2025 पुणे 1 दिनांक: 11/07/2025

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे संचालित
सिटी वर्ल्ड स्कूल, ( 27254100233 ) सर्व्हे क्र.86/2अे/1,86/2अे, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे

विषय - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन मान्यता पत्र क्रमांक एसएफएस-1023/प्र.क्र.356/ एसएम-2, दिनांक 16/07/2024 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-203/ज.रा.कु./मान्यता/पुवि/2024/7662,दिनांक 26/07/2024
3.मुख्याध्यापक यांचेकडील प्रस्ताव दिनांक 05/05/2025
4.श्री. ज्ञानदेव खोसे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती हवेली, जि.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 16/06/2025

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 5 वी ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सरस्वती दर्शन फाऊंडेशन, वानवडी, पुणे | सिटी वर्ल्ड स्कूल, ( 27254100233 ) सर्व्हे क्र.86/2अे/1,86/2अे, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा राज्यमंडळ स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 5 वी ते इयत्ता 8 वी | 2024-25 |

### अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1023/प्र.क्र.356/ एसएम-2, दिनांक 16/07/2024 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. भविष्यात या शाळेच्या प्रथम मान्यते बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे